महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : १६३ वा | दिनांक : ३०/०३/२०२५ | वार : रविवार

## मुलं माझी आहेत, पण करुणा शर्मा माझी पत्नी नाही - धनंजय मुंढे यांचा कोर्टात युक्तिवाद



**मुंबई :** राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांची मी पत्नी असल्याचे माझ्याकडे अनेक पुरावे आहेत. हे पुरावे मी पुढल्या सुनावणीत कोर्टात सादर करेल, असा दावा मुंडे यांच्या पत्नी असल्याचा दावा करणाऱ्या करुणा शर्मा मुंडे यांनी शनिवारी केला. आजच्या सुनावणीत स्वतः न्यायाधीशांनाही धनंजय मुंडे यांच्या वकिलांचा युक्तिवाद ऐकूण हसू आवरले नाही, असेही त्या यावेळी म्हणाल्या.

वांद्रे सत्र न्यायालयाने राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांना करुणा शर्मा यांना दरमहा 2 लाख रुपयांची पोटगी देण्याचे आदेश दिले होते. या आदेशांना मुंडे यांनी माझगाव सत्र न्यायालयात आव्हान दिले आहे. या प्रकरणी शनिवारी झालेल्या सुनावणीत धनंजय मुंडे यांनी करुणा मुंडे यांची दोन्ही मुले आपली असल्याचे मान्य केले, पण करुणा या आपल्या पत्नी नसल्याचा दावा केला. त्यांच्या या अजब युक्तिवादावर कोर्टाने आश्चर्य व्यक्त केल्याचे करुणा यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले आहे. एवढेच नाही तर न्यायाधीशांना त्यांच्या या युक्तिवादावर हसू आवरले नसल्याचेही त्या म्हणाल्यात.

करुणा शर्मा म्हणाल्या, आजच्या सुनावणीत न्यायाधीशांनी आम्हाला आमच्या लग्नाचे पुरावे सादर करण्याचे आदेश दिलेत. ते पुरावे आम्हाला आज सादर करता आले नाही. कारण, माझ्या वकिलांचा काहीतरी गैरसमज झाला होता. मागील 3-4 दिवसांपासून माझी प्रकृतीही बरी नव्हती. त्यामुळे मी यात लक्ष घातले नव्हते. पण कोर्टाने या प्रकरणी 5 एप्रिल तारखेला पुढील सुनावणी निश्चित केली आहे. त्या दिवशी आम्ही यासंबंधीचे सर्व पुरावे सादर करू.

मी धनंजय मुंडे यांची पत्नी असल्याचे माझ्याकडे अनेक पुरावे आहेत. उदाहरणार्थ, आमचे एचडीएफसी बँकेत जॉइंट खाते आहे. धनंजय मुंडे यांची एक कोटी रुपयांची बजाजची पॉलिसी आहे. त्यावर पत्नी म्हणून मी नॉमिनी आहे. त्यांनी जे स्विकृती पत्र लिहून दिले आहे. त्यावरही माझा उल्लेख पत्नी म्हणून आहे, असे त्या म्हणाल्या.

आजच्या सुनावणीत धनंजय मुंडे यांच्या वकिलांनी असा युक्तिवाद केला की, करुणा शर्मा या धनंजय मुंडे यांच्या पत्नी नाहीत, पण त्यांची दोन्ही मुले मुंडे यांचीच आहेत. पत्रकारांनी याविषयी करुणा यांना छेडले असता त्यांनी त्यांचा हा युक्तिवाद अत्यंत हास्यास्पद असल्याचा आरोप केला. तुम्हाला सर्वच गोष्टी माहिती आहेत. या युक्तिवादावर स्वतः न्यायाधीशांनाही हसू आवरले नाही. न्यायाधीश स्वतः त्यांना म्हणाले की, मुले तुमची आहेत, पण पत्नी नाही असे कसे होईल? मी याविषयीचे सर्व पुरावे 5 तारखेच्या सुनावणीत कोर्टात सादर करेन, असे त्या म्हणाल्या.

समोरच्या पक्षकारांनी मी आर्थिकदृष्ट्या संपन्न असल्याचा व निवडणूक लढवल्याचाही दावा केला. पण त्यांच्या या दाव्यातही कोणते तथ्य नाही. निवडणूक लढवण्यासाठी केवळ 10 हजार रुपयांच्या डीडीची गरज असते. त्यामुळे मी निवडणुकीत काही फार मोठा खर्च केला नाही. त्यांनी ज्या कंपन्यांचा उल्लेख केला आहे, त्या कंपन्या स्वतः धनंजय मुंडे यांच्याच आहेत. पण आज त्या बंद पडल्या आहेत. 2016 पासून त्यातून एकाही रुपयाचे उत्पन्न मिळत नाही, असे करुणा शर्मा म्हणाल्या.

## कोरटकर प्रकरणी मुख्यमंत्र्यांना विचारलेल्या प्रश्नावरून कॉंग्रेस प्रवक्त्यावर कारवाई



**नागपूर :** नागपुरातील गणेशपेठ पोलीस ठाण्यात कॉंग्रेस प्रवक्ते अतुल लोंढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाजप आमदार प्रवीण दटके, कृष्णा खोपडे आणि शहराध्यक्ष बंटी कुकडे यांच्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.

लोंढे यांनी शिवद्रोही प्रशांत कोरटकर प्रकरणी मुख्यमंत्र्यांना प्रश्न विचारले होते. कोरटकरला तेलंगणात पळून जाण्यास मदत करणारा प्रशिक पडवेकर हा मुख्यमंत्री कार्यालयाशी संबंधित असल्याचा आरोप त्यांनी केला होता. या प्रकरणी भारतीय दंड विधान कलम ३५६ (२) नुसार अदखलपात्र गुन्हा दाखल करण्यात आला.

लोंढे यांनी केलेल्या आरोपांनुसार, प्रशिक पडवेकर हा भाजपच्या एका प्रमुख नेत्याच्या नागपूर कार्यालयात काम करत होता. कोरटकरला चंद्रपुरातील हॉटेलात मुक्काम व्यवस्था करण्यापासून तेलंगणात पळून जाण्यास मदत करण्यापर्यंत पडवेकर सक्रिय होता. कोरटकरला अटक झाल्यानंतर पडवेकरलाही कोल्हापूर पोलिसांनी ताब्यात घेतले.

भाजपच्या तक्रारीत मुख्यमंत्र्यांची विनाकारण बदनामी, दोन समाजात तेढ निर्माण करणे आणि शांतता भंग होईल असे वातावरण निर्माण करण्याचा आरोप करण्यात आला आहे. पोलिसांनी लोंढे यांना न्यायालयात दाद मागण्याची सूचना दिली आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड प्रिंटर्स
डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.
मो. 8087880274, 8956362639, 9270446603, 9405109103
डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)
- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274
Email - sahilcomputer05@gmail.com

## राज ठाकरे यांची २००८ च्या हिंसाचार प्रकरणी निर्दोष मुक्तता

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना 2008 च्या हिंसाचाराप्रकरणी मोठा दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या प्रकरणी त्यांची पुराव्याअभावी निर्दोष सुटका केली आहे. कोणताही पुरावा नसताना राज ठाकरे यांच्याविरोधात फौजदारी खटला चालविणे म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने या प्रकरणी नोंदवले आहे.

2008 साली महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांना अटक झाल्यानंतर मनसेच्या कार्यकर्त्यांकडून राज्यात ठिकठिकाणी जाळपोळ आणि दगडफेक करण्यात आली होती. याचदरम्यान मनसेच्या कार्यकर्त्यांनी परळी-गंगाखेड मार्गावर एसटी बस थांबवून दगडफेक केली होती. या घटनेनंतर राज ठाकरे यांच्यासह मनसे कार्यकर्त्यांविरोधात सार्वजनिक मालमत्तेस नुकसान पोहचवल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात सुनावणी सुरू होती. या सुनावणीअंती राज ठाकरे यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली.

घटना घडतेवेळी राज ठाकरे हे तिथे उपस्थित नव्हते. तसेच त्यांनी आंदोलनकर्त्यांना आदेश दिल्याचा कोणताही पुरावा दोषारोपपत्रात नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाच्या न्या. विभा कंकणवाडी आणि न्या. संजय देशमुख यांनी राज ठाकरे यांच्याविरुद्ध 'सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान केल्याबाबत' दाखल गुन्हा आणि दोषारोपपत्र रद्द करुन त्यांची निर्दोष सुटका केली. तसेच कुठलाही पुरावा नसल्यामुळे राज ठाकरेंविरुद्ध फौजदारी खटला चालविणे म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा गैरवापर ठरेल, असे निरीक्षण उच्च न्यायालयाने नोंदवले.

2008 साली राज ठाकरे यांच्या अटकेनंतर उसळलेल्या दंगलीत परळी- गंगाखेड मार्गावर एसटी बस थांबवून दगडफेक केल्याबाबत राज ठाकरेंसह मनसे कार्यकर्त्यांविरोधात सार्वजनिक मालमत्तेस नुकसान पोहचवल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा रद्द करण्यासाठी राज ठाकरेंनी परळीच्या प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. या अर्जाच्या सुनावणीअंती औरंगाबाद खंडपीठाने 21 मार्च रोजी वरीलप्रमाणे आदेश दिला आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० मार्च २०२५


## शिक्षिकेच्या निरोप समारंभात विद्यार्थ्यांना अश्रू अनावर



**वैजापूर :** विद्यार्थी, शिक्षिका आणि शाळा यांचा घनिष्ठ संबंध अधोरेखित करणारा निरोप समारंभ नुकताच जिल्हा परिषद प्रा शाळा रघुनाथपूरवाडी ,ता वैजापूर येथे संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेले ग्रीटिंग कार्ड्स, भेटवस्तू, रांगोळीसह फुलांचा सडा घालून तसेच डोक्यावर फुलांची उधळण करत मॅडमला निरोप दिला. प्रतिक्रिया व्यक्त करताना विद्यार्थी आणि सहकारी शिक्षिकांनाही अश्रू अनावर झाले .काही विद्यार्थ्यांना तर अश्रू आणि हुंदक्यांशिवाय काहीच व्यक्त करता आले नाही. रघुनाथपूरवाडी शाळेमध्ये सेवा करत असताना श्रीमती साधना व्हनमाने मॅडम यांनी विद्यार्थ्यांना एमटीएस ओलिंपियाड सारख्या स्पर्धात्मक परीक्षांना तयार करत असताना सांस्कृतिक कार्यक्रम, वृक्षारोपण, वर्ग सजावट इत्यादी बाबी विशेषत्वाने राबविल्या. मातेची ममता आणि शिस्तीचा धाक दाखवत विद्यार्थ्यांशी अतूट नाते जोडण्यात मॅडम यशस्वी झाल्या. निरोपाच्या प्रसंगी मॅडमनेही विद्यार्थ्यांना पेन ,पेन्सिल इत्यादी शैक्षणिक साहित्यासह मिठाई भेट दिली.

याप्रसंगी केंद्रप्रमुख श्री एस व्ही कवार सर, संजय जाधव सर, श्रीमती जी बी पवार मॅडम, सूर्यकांत फडसर ,महेश खोसे सर, श्रीमती प्रतीक्षा राशिनकर मॅडम, विद्यार्थी व पालक उपस्थित होते. सहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## ज्ञानाला संस्काराची जोड मिळाल्यास जीवन समृध्द बनते : प्राचार्य डॉ. संजय अस्वले



**उमरगा :** शिक्षणाचा ज्ञानप्राप्ती हा हेतू असला तरी जीवनात समृद्धता प्राप्ती करावयाची असेल तर ज्ञानाला संस्काराची जोड द्यावी लागेल असे मत प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी व्यक्त केले. ते काल बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित निरोप समारंभाच्या कार्यक्रमात बोलत होते.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील कला शाखा आणि करियर कट्टा यांच्या वतीने बी. ए. तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना प्राचार्य संजय अस्वले यांनी विद्यार्थ्यांना भावी आयुष्यातील प्रगतीसाठी शुभेच्छा देताना महाविद्यालय विद्यार्थ्यांच्या प्रत्येक अडचणींमध्ये सहकार्य करण्यासाठी तयार असेल अशी ग्वाही दिली. स्वतः मध्ये कौशल्य निर्माण करण्यासाठी महाविद्यालयातील करियर कट्टा, पोलिस अकॅडमी, स्पर्धा परीक्षा यासारख्या सुविधांचा लाभ घेण्यासोबत पदव्युत्तर शिक्षणाच्या सुविधांचा लाभ घेण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले , प्रभारी प्रा. डॉ. वसंत हिसल आणि डॉ. प्रदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देवून भावी आयुष्या साठी शुभेच्छा दिल्या. यावेळी प्रसाद ममाळे, महादेवी सास्तुरे, गणेश मुंडे, ब्रह्मानंद गिरी, सैफ इनामदार, असिफ शेख आदी विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे हे होते. यावेळी डॉ. डी. बी. ढोबळे, करियर कट्टा समन्वयक डॉ. समाधान पसरकल्ले, डॉ. गिरिधर सोमवंशी, डॉ. ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले, सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. पद्मिनी कळणुरे यांनी केले तर उपस्थितांचे आभार प्रज्वल चव्हाण यांनी मानले.

## जामडी येथे घराला लागलेल्या आगीत संसारोपयोगी साहित्य खाक



**कन्नड (अरुण थोरात) :** जामडी फारेस्ट येथील शेतातील घरास लागलेल्या आगीत संसारोपयोगी साहित्यासह शेती साहित्य जळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे.जामडी फारेस्ट ता.कन्नड येथील शेतकरी लालचंद गोबरु पवार यांच्या गट क्र. ८४ मध्ये शेत आहे. या शेतातील घरास अचानक आग लागली. आगीत संसारोपयोगी साहित्य, अन्नधान्य, रासायनिक खते, शेणखत, ठिबक सिंचन साहित्य असे अंदाजे एक लाख रुपयांचे नुकसान झाले. लालचंद पवार यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरीबीची आहे. त्यातच संसारोपयोगी, शेती साहित्य ही जळाल्याने कुटूंब उघड्यावर पडल्याने त्यांस भरिव शासकीय मदत देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## अखेर शाळेच्या वेळेत बदल

**खुलताबाद (प्रा. योगेश रावते) :** जिल्हा परिषदेच्या शाळांची दुपारी साडेबाराला सुट्टी होत असल्यामुळे विद्यार्थ्यांना उष्माघाताची शक्यता होती . त्यामुळे शाळेची वेळ सकाळी ७:०० ते ११:०० करावी या बाबत पालक व शिक्षकांकडून मागणी होत होती.याची दखल घेत शासनाने शाळेची वेळ सकाळी ७:०० ते ११:१५ ठेवावी, असे आदेश दिले आहेत.शालेय शिक्षण विभागाने सकाळी सात ते दुपारी साडेबारा अशी शाळेची वेळ ठरवली होती. यावेळी उन्हाची तीव्रता जास्त असते. शाळा सुटल्यानंतर भरदुपारच्या उन्हात विद्यार्थी घरी जात असल्याने त्यांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची भीती पालक, शिक्षकांनी वर्तवली होती. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी वाडी, वस्ती, तांड्यावर शाळांमध्ये शिक्षण घेतात त्यांना सायकल किंवा पायी प्रवास करावा लागतो. बऱ्याच ठिकाणी वाहतुकीची व्यवस्था नाही किंवा पालकांना रोजगारासाठी बाहेर जावे लागते ते मुलांना घेण्यासाठी शाळेत जाऊ शकत नाही यामुळे मुलांना थकवा, चक्कर, डोकेदुखी यासारख्या समस्या येत होत्या .याबाबत शिक्षक संघटनांनी शाळेच्या वेळात बदल करावी अशी मागणी लावून धरली होती. याची दाखल घेत शासनाने वरीलप्रमाणे आदेश दिले आहेत तसेच विशेष काळजी घेण्याच्या सूचना देखील केल्या आहेत.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा. संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० मार्च २०२५


## सैन्य दलातील जवान पवन ताठे चा निपाणी येथे सत्कार



**कन्नड (अरुण थोरात) :** ग्रामीण भागातील जाण असलेली, विद्यार्थी भिमुख म्हणून नावारूपाला येत असलेली शिक्षण संस्था जिजामाता कला, वाणीज्य व विज्ञान महाविद्यालय निपाणी ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थी पवन बाळासाहेब लाठे याची भारतीय सैन्य दलात निवड झाल्या बद्दल महाविद्यालया च्या वतीने त्याचा सत्कार करण्यात आला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून आपल्या मेहनतीच्या व जिद्दीच्या जोरावर त्याने हे यश मिळवले. त्याच्या या निवडीबद्दल पवन व त्याचे पालक बाळासाहेब लाठे यांचा सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला. प्रा. अजमेरा यांनी पवन च्या संघर्षाबद्दल मनोगत व्यक्त केले व यावेळी प्राचार्य गोंगे यांनी सांगितले की, ग्रामीण भागातून अनेक विद्यार्थी पोलीस, आर्मी भरती यासाठी मेहनत करत असतात. त्यासाठी सातत्य असणे गरजेचे आहे. अभ्यास व मेहनतीच्या जोरावर आपल्याला यश हे नक्कीच मिळते. प्रत्येक तरुणाने पवन ताठे चा आदर्श व आपल्या आई वडीलाचे कष्ट डोळ्यासमोर ठेऊण जिद्द, चिकाटी, सराव तयारी करुण आपल्या आई वडिलांचे स्वप्न पुर्ण करावे असे अवाहन केले, या सत्कार समारंभ प्रसंगी महाविद्यालयाचे संस्थाचालक जी. एस. पवार यांनी अभिनंदन केले व महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

## शरणपूर येथील रस्त्याचे डांबरीकरण कामाचा सरपंच सौ.संध्या सदावर्ते यांच्या हस्ते शुभारंभ



**पडेगाव (शिवाजी गायकवाड) :** येथून जवळच असलेल्या शरणापूर येथिल मुख्य रस्ता ते शरणापूर -धरमपूर गाव हद्दी पर्यंत च्या असलेल्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजना अंतर्गत दिनांक २६ मार्च बुधवार रोजी शरणापुर गावचे सरपंच सौ संध्या संदीप आप्पा सदावर्ते यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. मागील बऱ्याच दिवसापासून सुरु असलेल्या कच्या रस्त्याचे काम खडिकरणांनंतर काम सुरु झाले. म्हणून सरपंच व यावेळी ग्रामपंचायत सदस्य,कॉन्ट्रॅक्ट आदींननी प्रयत्न केले.या रस्त्याचे डांबरी कारणास सुरुवात झाली यावेळी ग्रामपंचायत सदस्य मुक्तताई विलास भवर, अशोक आप्पा सदावर्ते संदीप कान्हेरे व शरणापूर येथील नागरिक यांच्या उपस्थित सुरवात करण्यात आली.


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

**साहिल**
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.


## जेईएस महाविद्यालय दोन दिवशीय क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाची राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

### युवकांसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण क्षेत्रात अनेक रोजगाराच्या संधी.-प्रा. डॉ. अंजली ठाकरे




**जालना (प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे) :** युवकांसाठी क्रीडा व शारीरिक शिक्षण या क्षेत्रामध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध असून युवकांनी या क्षेत्राकडे वळावे असे प्रतिपादन,शिवाजी महाविद्यालय अमरावती येथील क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. अंजली ठाकरे यांनी जालन्यात जेईएस महाविद्यालयात आयोजित क्रीडा व शारीरिक शिक्षण विषयाच्या राष्ट्रीय परिषदेच्या चर्चासत्रात केले. जेईएस महाविद्यालयच्या क्रीडा विभाग व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर तसेच शारीरिक शिक्षण संस्था नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसीय क्रीडा व शारीरिक शिक्षण आंतरशाखीय संबंध बाबत राष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि.२८ ते २९ मार्च २०२५रोजी करण्यात आले असून, उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षपदी जालना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम बगडिया हे होते, तर प्रमुख पाहुणे अमरावती येथील शिवाजी महाविद्यालयाच्या क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डॉ.अंजली ठाकरे, व संस्थेचे उपाध्यक्ष श्री फुलचंद भक्कड , डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रभारी क्रीडा विभाग संचालक प्रा. डॉ संदीप जगताप, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे क्रीडा संचालक प्रा.डॉ. सिंकू कुमार सिंग, हे व्यासपीठावर नाशिक येथील योगशिक्षक प्रा.नरवडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांची उपस्थिती होती.

यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक क्रीडा विभाग प्रमुख डॉ.हेमंत वर्मा यांनी केले असून महाविद्यालयात तिसरी राष्ट्रीय परिषद व चर्चासत्र असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर गणेश अग्निहोत्री यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास व परंपरा सांगितली असून ,या महाविद्यालयात अनेक राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू होऊन गेल्याचे सांगून, आर्चरी या खेळात दरवर्षी चार-पाच खेळाडू राष्ट्रीय स्तरावर कामगिरी यशस्वीपणे करत असल्याचे सांगितले. महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी क्रीडा मार्फत सर्व खेळांसाठी सुविधा उपलब्ध करून देऊ असेही डॉ. अग्निहोत्री यांनी सांगितले.यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून बोलताना प्राध्यापिका डॉक्टर अंजली ठाकरे म्हणाल्या की आज क्रीडा व शारीरिक शिक्षण या विषयांमध्ये रोजगाराच्या मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध आहेत क्रीडा क्षेत्रात पत्रकारिता करू शकतात तसेच मार्गदर्शक कोच उत्कृष्ट खेळाडू म्हणूनही नावलौकिक कमवू शकतात त्याचबरोबर फिजिओथेरपीस चेही कार्य करू शकतात .क्रीडा स्पर्धांचे व्यवस्थापनाचे कार्यही करू शकतात. खाजगी जिम व व्यायाम शाळा काढू शकतात.देश विदेशात अनेक रोजगार खेळाडूंना उपलब्ध आहेत, असेही डॉ. अंजली ठाकरे यांनी सांगितले. यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगरचे क्रीडा विभाग प्रभारी संचालक डॉ.संदीप जगताप व नांदेड स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. शंकू कुमारसिंग यांनी आपले मनोगत व्यक्त केलेत.अध्यक्ष समारोप करताना श्री. पुरुषोत्तम बगडिया म्हणाले की जेइएस महाविद्यालयात वेगवेगळे खेळ खेळले जात असून, खेळासाठी कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडणार नाही,त्याची सुविधा आम्ही उपलब्ध करून देऊ. खेळाने मानवी शरीर तंदुरुस्त असते ,असेही श्री बगडिया यांनी सांगितले.या राष्ट्रीय परिषदेत घनसांगवीचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा डॉ. बप्पा मस्के, भोकरदन चे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ.रोकडे, प्रा. डॉ.चंद्रशेखर, जेईएस महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय परिषदेत सहभागी खेळाडू व क्रीडा शिक्षक, योगा शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका भाग्यश्री बियाणे यांनी केले तर उपस्थिताचे आभार प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे यांनी मानलेत. ही राष्ट्रीय परिषद यशस्वी होण्यासाठी डॉ. किशोर बिरकायलू प्रा. राहुल सारस्वत, डॉ.प्रवीण चंदनशिवे, सेवक श्री विलास बोधले, श्री धर्मेंद्र आंबट, श्री साईनाथ आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० मार्च २०२५


## चापानेर येथे ब्रिकेटच्या कारखान्याला भीषण आग, ९० लाखाचे नुकसान



**कन्नड (अरुण थोरात):** चापानेर ता.कन्नड येथील मक्याच्या बिट्यापासून ब्रिकेट्स तयार करणाऱ्या कारखान्यास रविवारी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागली यामध्ये मशीनरी, शेड, कच्चामाल व पक्का माल असे एकूण ९० लाख रुपयांचे नुकसान झाले होते. ही आग कन्नड तालुक्यातील चापानेर येथील डी ए एस पी ब्रिकेट्स इंडस्ट्रीज एलएलपी या कारखान्यास लागली चापानेर येथील दशरथ गोरखनाथ सोमासे व अर्जुन गोरखनाथ सोमासे या शेतकऱ्याने दोन वर्षापूर्वी गट क्रमांक आठ मध्ये डी ए एस पी इंडस्ट्रीज या ब्रिकेट बनवण्याचा कारखाना सुरू केला होता. यात तयार होणाऱ्या ब्रिकेट्स हा औद्योगिक वसाहतीतील कंपन्यांना जळतंन म्हणून पूर्वीला जात होता. शनिवारी रात्री आठ वाजेच्या सुमारास कारखाना बंद करून कामगार घरी गेले.

दरम्यान रविवारी पहाटे अडीच ते तीन वाजेच्या सुमारास कारखान्याला अचानक आग लागली पहाटे चारच्या सुमारास ही बाब शुभम घुले या तरुणाच्या लक्षात आली त्यांनी तात्काळ फोन करून ही माहिती अर्जुन सोमासे यांना दिली यांच्यासह ग्रामस्थ आग विझवण्यासाठी धावले मात्र आग मोठी असल्याने अडचणी आल्या आग आटोक्यात येत नसल्याचे पाहून कन्नडतील अग्निशामक दलाला माहिती दिली मात्र तेथील बंब खराब असल्याने ते येऊ शकले नाही यानंतर छत्रपती संभाजीनगर पालिकेचा व बारामती अग्रो कन्नड अग्निशामक दलास पाचरण करण्यात आले त्यांनी आठ तासाचा अथक प्रयत्नाने आग आटोक्यात आणली मात्र तोपर्यंत डीएएसपी ब्रिकेट्स इंडस्ट्रीज एलएलपी कंपनीचा बनवलेला पक्का माल, कच्चा माल, मशीन व पत्राची सेट हे पूर्ण जळून खाक झाले होते. ही आग शॉर्टसर्किटमुळे लागलेली असावी असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. आग आटोक्यात आणण्यासाठी दादासाहेब थोरात, बाळू हिरे, संतोष सोमासे, सोमनाथ भांडईत, संदीप ठुबेआदी सह ग्रामस्थानी मदत केली.

घटनास्थळी मंडळ अधिकारी विकास वाघ यांनी पंचनामा केला यावेळी कन्नड पोलीस ठाण्याचे सपोनी रामचंद्र पवार, बीट जमादार बाबासाहेब धनुरे यांनी घटनास्थळी भेट दिली. दि. २७ मार्च रोजी विधानपरिषदे चे विरोधी पक्षनेते आ.अंबादास दानवे यांनी भेट देऊन माहिती घेतली. प्रतिकुल परिस्थितीत सामान्य कुटूंबातील भावंडानि सुरु केलेल्या व्यवसायाची राखरांगोळी झाल्याने पिडीतांना शासनाने आर्थिक मदत करण्याची मागणी होत आहे.

## माजी सैनिक अशोक हांगे यांची महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या समितीत सदस्यपदी निवड.



**पडेगाव (शिवाजी गायकवाड)** : येथील माजी सैनिक अशोक हांगे यांची महाराष्ट्र राज्यातील आजी माजी सैनिक यांच्या कुटूंबियांना संरक्षण देण्याबाबत महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या वतीने समितीत सदस्य म्हणून निवड करण्यात येऊन समिती गठीत करण्यात आली आहे तसेच महाराष्ट्र शासन, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र. एमआयएस १००६/प्र.क्र.३०९/वि.शा.४, दि.०४/१०/२०२७ अन्वये राज्यातील सर्व जिल्हयात गठीत करण्यात आलेल्या समित्यांची माहिती आणि समितीमधील सर्व सदस्य यांचे नावे पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिकृत पोलीस संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेली आहे. सैनिक / माजी सैनिक यांच्या कुटूंबियांना संरक्षण देण्याबाबत गठीत समितीच्या मासिक बैठकांमध्ये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसारीत करण्यात आलेली माहिती सर्व माजी सैनिक यांना निर्दशनास आणुन देण्यात येणार आहे, जेणे करुन त्यांच्या तक्रारीचे निवारण करणे त्यांना सुलभ जाईल असे पत्र राज तिलक रौशन सहायक पोलीस महानिरीक्षक (का. व सु.) पोलीस महासंचालक यांनी काढले आहे.त्यात छत्रपती संभाजी नगर पडेगाव चिनार गार्डन येथिल माजी सैनिक अधिकारी श्री अशोक हांगे यांची निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. महाराष्ट्र राज्यातील सैनिक व माजी सैनिकांच्या संरक्षण देण्याकरता गठीत करण्यात आलेल्या माजी सैनिक समितीमध्ये अधिकारी अशोक हंगे यांची निवड करण्यात आली. या समितीत जिलधिकारी प्रशांत स्वामी पोलीस आयुक्त प्रवीण पवार हे अध्यक्ष असणार आहेत.तर १९ सदस्यांची ही समिती स्थापन करण्यात आली आहे.






## मंजुर विकास आराखड्या मुळे व्यवसायिक आनंदी झाले सामान्यहो आत्ताच व्यक्त होऊ नका - डॉ राजेंद्र दाते पाटील यांचे आवाहन



**छत्रपती संभाजीनगर** - समाजाच्या गरजाशी संवेदन शीलता निर्माण करणे म्हणजे प्रारूप विकास आराखडा असा अपेक्षित आशय असल्यामुळे सध्या मंजुर विकास आराखडा मंजुरी नंतर समस्त व्यवसायिक आनंदी झाले आहेत त्यामुळे आत्ताच व्यक्त होऊ नका असे आवाहन जन आंदोलन विकास कृती समिती, महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.डेव्हलपमेंट ॲक्शन प्लॅन हे एक संरचित दस्तऐवज किंवा साधन आहे जे व्यावसायिक किंवा इतर सर्वच उन्नती तथा वाढीसाठी एखाद्या व्यक्तीची उद्दिष्टे आणि ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या विशिष्ट पावले किंवा कृतींची रूपरेषा देतात.यात सामान्यत: प्रगतीचे मूल्यमापन करण्यासाठी टाइम लाइन, आवश्यक संसाधन,संभाव्य आव्हाने आणि मोजता येण्याजोग्या परिमाणांचा समावेश असतो.1991 च्या मंजूर आराखड्या तील नकाशे आणि प्रारूप विकास आराखड्यातील नकाशां मधील तांत्रिक चुका मुळे गट आणि सर्व्हे नंबरच्या क्षेत्रफळा मध्ये मोठी तफावत निर्माण झाली असुन याचा परिणाम आता रस्त्यांची आखणी विकास परवानगी, रेखांकनाला मंजुरी देताना अडचणी निर्माण होणार असल्याची बाब आपण आक्षेप नोंदवताना घेतलेला आहे.6 मार्च 2024 रोजी प्रसिद्ध करण्यात आला असुन सदरचा प्रारूप विकास आराखडा तयार करताना इ.एल.यू. एक्झीस्टिंग लॅंड यूज म्हणजे अस्तिवात जमीन वापर नकाशा हा विचारत घेता सध्या या जमिनीचा वापर रहिवासी क्षेत्र,क्रीडांगण,स्मशान भुमी,कब्रिस्थान,शाळा,रस्ता,बगीचा व इतर काय उपक्रम अस्तित्वात आहे या सर्व बाबी विचारात न घेता किंवा या बाबत काही एक अभ्यास केल्या शिवाय पी.एल.यू. प्रपोज्ड लॅंड यूज म्हणजे भविष्यासाठी प्रस्तावीत करावयाचा अस्तित्वा तील जमीनीचा वापर प्रस्तावीत असलेला नकाशा म्हणजे हा प्रारूप विकास आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या नकाशातील परिमाण मोजमापा मध्ये प्रचंड अनेक दुरोगामी परिणाम करणाऱ्या तांत्रीक चुका जाणुन बुजुन करण्यात आल्या असुन या परिणामांचा योग्य वापर केलेला नसल्यामुळे गट आणि सर्व्हे नंबर मधील परीमाण मधील लांबी व रुंदी परिणामात: प्रचंड अयोग्य बाबी व चुका झाल्या असुन प्रारूप आराखडा तयार करतांना प्रस्तावित नकाशांचा दर्शविण्यात आलेला परिमाण आणि यापूर्वी 1991 मधील मंजूर नकाशा तील परीणाम यामध्ये तफावत आली आहे. या तफावतीमुळे विकास आराखड्या तील रस्त्यांची आखणी,विकास परवानगी, रेखांकन मंजुरी आणि इतर तत्सम परवानगी देतांना चुकलेल्या या बाबींचा नक्कीच परिणाम होणार असल्याची गंभीर तक्रार आपण नोंदवलेल्या असुन आता नक्की कशास मंजुरी दिली तो नकाशा पाहिल्या शिवाय समिती पैकी कृपया कोणीही व्यक्त होउ नये असेही आवाहन जन आंदोलन विकास कृती समिती, महाराष्ट्रचे अध्यक्ष आणि शहर विकासाचे जेष्ठ अभ्यासक राजेंद्र दाते पाटील यांनी केले आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० मार्च २०२५

## लाखनी तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील गंभीर प्रकार - अनेक दस्तावेज जीर्ण, महत्वाचे जमीन दस्तावेज धोक्यात



**भंडारा :- (एम. वी. बनसोडे)** जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील भूमी अभिलेख कार्यालयात असलेल्या अनेक महत्त्वाच्या जमिनीसंबंधी दस्तावेजांची स्थिती अत्यंत दयनीय झाली आहे. कर्मचाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे हे दस्तावेज जीर्ण अवस्थेत असून त्यांचे संगोपन करण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याचे चित्र समोर येत आहे.भूमी अभिलेख कार्यालय हे जमिनीची नोंद, फेरफार, मालमत्ता अभिलेख, ७/१२ उतारे इत्यादी दस्तावेज सुरक्षित राखण्याचे महत्वाचे ठिकाण आहे. परंतु लाखनी कार्यालयातील कामकाजात झालेल्या दिरंगाईमुळे अनेक जुने दस्तावेज खराब, फाटलेले व वाचण्यायोग्य नसलेले झाले आहेत.यासंदर्भात नागरिकांनी अनेकदा तक्रारी केल्या असून, कर्मचारी मात्र उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. काम वेळेत न करणे, माहिती न देणे आणि नागरिकांना टोलवणे हे प्रकार वारंवार होत आहेत.ही स्थिती केवळ प्रशासकीय हलगर्जी नाही, तर भविष्यातील मालमत्ताविषयक वाद, पुरावे नष्ट होणे आणि नागरिकांच्या मालकी हक्कांवर थेट परिणाम करणारी आहे. त्यामुळे राज्य शासनाने व जिल्हा प्रशासनाने त्वरित लक्ष घालून, दस्तावेजांचे डिजिटायझेशन आणि जतनाचे उपाययोजना करणे गरजेचे आहे.नागरिकांचा हक्क असलेली माहिती सुरक्षित आणि सहज उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे, आणि लाखनी तालुक्यातील या स्थितीवर त्वरित कार्यवाही झाली नाही तर जनआंदोलन छेडण्याची गरज भासू शकते, असा इशारा सामाजिक कार्यकर्ते व नागरिक देत आहेत.

## ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी ग्राहक हक्क शिक्षणाची गरज. श्री गोविंद येरमे




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष दिवंगत जॉन एफ केनेडी यांनी १५ मार्च १९६२ रोजी ग्राहक हक्काचा ठळक मुद्दा मांडला. तसेच भारतामध्ये १९८३ च्या ग्राहक चळवळीने ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी त्रिस्तरीय तक्रार आणि निवारण मंच उपलब्ध करून देण्यात आला. प्रत्येक ग्राहकांना वस्तू आणि सेवा निवडणे, माहिती घेणे, त्याबद्दल मत मांडण, तक्रार करणे आणि निवारण करून घेणे असे सहा ग्राहकांचे हक्क ग्राहक संरक्षण कायदा १९८६ मध्ये नमूद केले आहे. प्रत्येकानी या सहा हक्काचे शिक्षण घेणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन तहसीलदार श्री गोविंद येरमे यांनी केले.येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात तहसील कार्यालय उमरगा आणि वाणिज्य मंडळाच्या वतीने ग्राहक दिनानिमित्त एक दिवशीय ग्राहक कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी श्री येरमे बोलत होते.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी आणि प्रमुख उपस्थितीमध्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले, नायब तहसीलदार अमित भारती, पुरवठा निरीक्षक सचिन बिराजदार यांची उपस्थिती होती. या कार्यशाळेत प्रमुख वक्ते ग्राहक पंचायत चे संघटक प्रा हेमंत वडणे यांनी ग्राहकांचे हक्क आणि त्याची होणारी फसवणूक यासाठी ग्राहक संरक्षण कायद्यातील तरतुदी आणि त्यावर केलेल्या कार्याची माहिती उपस्थितांना दिली. अध्यक्षीय समारोपामध्ये प्रमोद कुलकर्णी यांनी ग्राहक हक्कांची होणारी पायमल्ली थांबवण्यासाठी ग्राहक मंचाच्या वतीने राबवण्यात येणारे उपक्रम ची माहिती देताना तरुणांनी या चळवळीत सामील व्हावे असे आवाहन केले. कार्यशाळेच्या खुल्या चर्चा मध्ये विद्यार्थी प्राध्यापक आणि नागरिकांनी सहभाग घेतला आपल्या समस्या आणि आपण आपणास आलेले अनुभव झालेली फसवणूक या विषयावर खुली चर्चा करण्यात आली. यासाठी मान्यवरांनी त्यांच्या शंकां आणि समस्यांचे निरासन केले.या कार्यशाळेत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजारी यांनी उमरगा तालुक्यातील सर्व राशन धारक नागरिक आणि पुरवठादार दुकानदार तसेच विद्यार्थ्यांना एक देश एक सिद्धा पत्रक याबाबत ई-केवायसी साठी आव्हान करणारी चित्रपट दाखवण्यात आली आणि आव्हान करण्यात आले. कार्यक्रमाच प्रास्ताविक प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी केले. यावेळी उमरगा तालुका ग्राहक पंचायतचे अध्यक्ष नंदकुमार शिंदे, तालुका ग्राहक पंचायतचे संघटक धनराज शिंदे , महिला संघटक अश्विनी जोशी उपप्राचार्य डॉ विलास इंगळे उपप्राचार्य डॉ पद्माकर पिठले, प्राध्यापक, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .कार्यक्रमाच सूत्रसंचालन प्रा अक्षता बिराजदार आणि आभार प्रदर्शन प्रा. ओमप्रकाश पवार यांनी केले. कार्यक्रमासाठी प्रा खंडू मुरळीकर प्राओमप्रकाश पवार प्रा राणी बेंबळगे, प्राअंजली चव्हाण, वाणिज्य मंडळाचे सचिव श्रीजल पाटील, सहसचिव प्रतीक्षा जाधव, कोषाध्यक्ष ऋतुराज माने, तेजस दांडगे आदींनी परिश्रम घेतले.

## माणदेश - परंपरेचा महिमा



माणदेशा, तुझ्या मातीत काहीतरी
वेगळं आहे,
तुझ्या मातीच्या कणाकणात
संघर्षाची गोडी मिसळलेली आहे.
तू वाऱ्याच्या वेगाने उधळणारा,
पण तितक्याच शांतपणे
ज्ञानाच्या दीपांना तेवत ठेवणारा आहेस.

तुझ्या पठारावर घोंगावणाऱ्या वाऱ्यात
समाधीस्थ ऋषींचे आवाज ऐकू येतात,
शब्दांच्या माळा गुंफणारे संत,
अध्यात्माच्या वाटा दाखवणारे महंत,
आणि शाहीरांच्या ओठावर उठणारे स्वातंत्र्याचे सूर,
हेच तर तुझे माणदेशी भूषण!

एका बाजूला सिद्धनाथाची आराधना,
तर दुसऱ्या बाजूला तुकारामाचा अभंग,
ज्ञानेश्वरीची गोडी, नामदेवांची भक्ती,
हेच तुझं संस्कारधन!
इथे महंतांनी जपलेले गूढ मार्ग,
संन्यस्त जीवनाच्या वाटेवर चालणाऱ्या
शेकडो ऋषींचे अदृश्य पाऊलखुणा अजूनही जिवंत आहेत.

संतांनी इथं ओवली जीवनाची समृद्धता,
गरीब, कष्टकरी, बहुजनांसाठी त्यांनी उभा केला
समता आणि करुणेचा अढळ दीपस्तंभ.
कोण जात, कोण पंथ, कोण राजा, कोण रंक?
संतांच्या वाणीने हे सारेच मिटवले!

इथे तलवारींच्या टोकावर
इतिहास लिहिला गेला,
इथल्या मावळ्यांनी शिवबांसाठी रक्त सांडलं,
इथल्या वीरांनी मराठ्यांचा गड राखला!
रणांगणात उतरलेल्या माणदेशी वीरांनी
स्वाभिमानाच्या शपथा घेतल्या,
इथे लढणं रक्तात आलंय,
इथला कणखरपणा मातीत मिसळलाय!

हेच ते माणदेशी,
जिथं शब्दांना धार आहे,
कवितांमध्ये बंड आहे,
गायनात स्वाभिमान आहे,
लोकगीतात संघर्षाची साक्ष आहे!

पण आता, माणदेशा, तुझी ही परंपरा
धोक्यात येत नाही ना?
तुझ्या माणसांना आजही न्याय मिळतोय का?
तू आता कोणत्याही राजकारणाचा शिकार
होत नाहीस ना?
तुझ्या लोकांना अजूनही त्याच संघर्षातून
जात रहावं लागत नाही ना?

तुझ्या मातीतून नवे संत जन्मावे,
समतेची नवी गीते लिहिली जावीत,
तुझ्या कणखर लेकरांनी
शेतात आणि रणांगणात
एकाच ताकदीने उभं राहावं,
तू पुन्हा तुझ्या इतिहासाचा साक्षीदार व्हावा,
तुझ्या वर्तमानावर अभिमान असावा,
आणि भविष्य तुझ्या परंपरेइतकंच
संपन्न, तेजस्वी आणि सन्माननीय असावं!

हे माणदेशा, तुझं वैभव अमर राहो!

**प्रा.विजय पांडुरंग शिंदे**
**श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी**
**ता. आटपाडी जि. सांगली.**
**मोबाईल.9421166574**

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार ३० मार्च २०२५

# संस्कार करतांना मुलांच्या अपेक्षा



आपले पाल्य म्हणजेच मुलांना योग्य संस्कार देण्यासाठी पालकांची अत्यंत महत्वाची भूमिका. असते मुलांच्या जडण-घडणीत आई व वडीलांचा तसेच एकत्र कुडेव असल्यास आजी आजोबांचा मोलाचा वाटा असतो त्यांना योग्य संस्कार देणे म्हणजे मुलांना नैतिक मूल्ये जबाबदारीची जाणीव आणि स्वावलंबन शिकवणे, यातूनच मुलांचा व्यक्तिमत्व विकास घडत असतो, पालकांनी संयम, प्रेम आणि सकारात्मक दृष्टिकोन त्यांच्याशी संवाद साहाला पाहिजे. संस्कार म्हणजे केवळ शिकवणे नाही तर त्यांना त्यांच्या कृतीतून समजायला लावणे हे खारे पालकत्व आहे."चांगले संस्कार हे मुलांच्या उज्वल भविष्यासाठी सर्वात मोठी शिदोरी आहे"आणि आपण ही शिदोरी आयुष्यभरासाठी मुलांना देत असतो . जश्या संस्कार देतांना आपल्या अपेक्षा मुलांकडून असतात तश्याच अपेक्षा दैनंदिन जीवन जगत असतांना मुलांच्याही आपल्या पालकांकडून असतात. याकडे पालक लक्षच देत नाही. संस्कारशील मुल घडवतांना पालक-बालक हे दोन्ही व्यक्तीमत्व जबाबदार असतात. पालक खत:ला आदर्श मानून सदैव बालकाला घडवत असतात पण पालकाचेही काहीवेळा चूकते हे त्यांना समजत नाही मुलांच्या शारीरिक,बोध्द्रोक, मानसिक गरजा भागवूनच त्यांचा. सर्वांगीण विकास घडत असतो अश्यावेळी त्यांच्या अपेक्षांचा विचार करणे तीतकेच महत्वाचे असते. १) माझ्यावर मनापासून प्रेम करा - मुलांना प्रेम, माया, ममता यांची चांगलीच समाज असते. वरवर गोड बोलणं आणि मनापासून व्यक्त होणे हे त्यांना समस्ते गरजा भागवन म्हणजे प्रेम नव्हे मुलांना वेळ देणे, सांच्याशी संवाद साधने, त्यांना व्यक्त होण्याची संधी देणे, मानसिक, भावनीक, जवळीकता साधने या बाबीही तीतक्याच महत्वाच्या आहेत२)गर्दीत किंवा इतरांसमोर मला ओरडू नका-पालक नेहमी मुलांना गृहित धरतात. सहज प्रवृत्तीने त्यांना बोलतात मात्र स्वाभिमानाची भावना ही जन्मतःच विकसित होत असते. मुलांचे वर्तन चूकिचे असेल किंवा काही अनावधानाने ते चूका करत असतील तेव्हा आपण सहजच त्यांना रागवतो ओरडतो ही सवय एवढी बळावते की ती चार चौघात गर्दीत ही आपण ओरडण्यास व रागवण्यास सुरू होतो. येथेच मुलांचा आत्मसन्मान दु:खावतो त्यांनाही वाईट वाटते, राग येतो. पालकाचे ते अनुकरण करतात व तसेच तुमच्या सोबत वागतात. म्हणून मुलांना प्रेमाणे समज दिली पाहिजे, योग्य-अयोग्याची जान दिली पाहिजे व प्रसंगी असा प्रसंग आला तर त्यांना एकांतात समजवून त्यांना त्यांची चूक निदर्शनात आणून दयावे त्यांचा आत्मसन्मान दु:खावणार नाही याची काळजी घ्यावी.३) माझी तुलना माझ्या भावा, बहिणी किंवा इतर कोणाशीही करू नका.-पालक नेहमी दोन पाल्यांमध्ये किंवा इतरांशी तुलना करीत असतात. अश्या तो/ती बघा कसा कसा दुशार, आज्ञाधारक, प्रामाणिक, अभ्यासू, क्रियाशील आहे असे नेहमीच बोलले जाते यामुळे मुळांमध्ये इतरांबद्दल इर्शा निर्माण होते. निवूनगंड निर्माण होते. चूकी व अपमान होतो म्हणून नव्याने काही करण्यास मुले समोर येत नाही यामुळे मुलांचा सुजनशीलतेचा विकास होत नाही नवीन ऍक्टीव्हीटी करण्याचा ते प्रयत्न करीत नाही प्रत्येकाची विचार करण्याची व कामाची पद्धती वेगळी असते प्रत्येकाची क्षमताही वेगळी असते म्हणून मुलांची तुलना इतरांशी नये ४) हे विसर नका मी तुमचीच प्रतिमा आहे. —मानवी आयुष्यात अनुवंशीकता अतीशय महत्वाची असते शरीर रचना ते हालचाली व स्वभाव ह्या काही अंशी अनुवंशीकते वरच आधारीत असतात. परंतू वर्तनचा ५०% भाग मुल अनुवंशीकात व ५०% अनुवरणातून शिकत असतो, त्यात प्रथम आई-वडील,गुरू, भाऊ-बहीण यांच्या वर्तनातून मूल अनुकरण करत शिकत असते. जर घरात सतत प्रेमळ समजूदारीचे, मदतीचे वर्तन होत असेल तर मुलांचा स्वभावा तसाच होतो. नेहमी आरडा-ओरड, मार-झोड, शिवी-गाळ होत असेल तर मुलं तेच 'शिकते. म्हणून मुल घडवतांना आई-वडिलांनी आपल्या पर्तनावर नियंत्रण ठेवावे जसे आई वडील वागतात तसे मुलं अनुकरण करून आई-वडीलांची प्रतीमा बनते मुलांसमोर वागतांना ,बोलताना भान असू द्यावे तेव्हाच मुलांना योग्य वळन लावता येईल ५) जस जसा मी मोठा होत आहे तस-तसे तुम्ही मला लहान मुल समजू नका- मुल जसजसे मोठे होते तसे अनुकरणातून व सभोवतालच्या परिसरातून खूप नवनवीन गोष्टी शिकत असतात. अश्यावेळी त्यांना वेळोवेळी प्रोत्सानाची गरज असते. त्यांच्या शिकव्याच्या प्रयत्नातून आत्मविश्वास वाढतो शिवाय सृजनात्मक विकास होतो,त्या नवीन धाडस करतांना किंवा नव्याने शिकतांना तु अजून लहान आहेस, तुला जमनार नाही, तुला करता येणार नाही असे ' नकारात्मक विधान नसावे त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास कमी होतो व ते पुढे नवीन काही शिकताना मागे सरतात मुलांना नेहमी तु कुरू शकतो,तू हुशार आहेस, हे तुलाच जमेल असे सकारात्मक व उर्जा वाढवनार वक्तव्य केले पाहिजे, ६)मला प्रयत्न करू दया जर मी चूक केली तर मला समजवातुला जमनार नाही, नको, नाही असे विधान तुला जमनार नाही वापरून मुलांना मागे खेचण्यसपेक्षा त्याना तु करू शकतो/ते तुलाच जमेल, असे विधान वापरले तर मुलांची उर्जा वाढते व ते अधिका अधिक उत्कृष्ट कार्य करण्याचा प्रयत्न करतात आधी त्यांना करू दया त्यांना नाही जमले तर मार्गदर्शन करा, समजवा पुन्हा करू नका असे नको योग्य-अयोग्य 'पद्धतीची त्यांना समज आली तरच पुढील आयुष्यात निर्णय घेण्यास सक्षम होतील ७)मला नको म्हणून धाबवू नका, पण कृपया स्पष्ट करा की ते का चूकीचे आहे बर्याच वेळा पालक नको म्हणून विरोध करतात त्यांच्या क्षमता ओळखतांना चूकतात त्यांनी घेतलेले निर्णय योग नाही हा गैरसमज असतो परंतू . मुलाना धाडस करूकूच दिले नाही, त्यांच्या कल्पक्तचा सृजनात्मक विकासास चालना दिलीच नाही तर त्यांचा आत्मविश्वास मंदावतो मुलांना धाडस करू दयावे त्यांचे निर्णय त्यांना घेवू दयावे त्यांची संकल्पना त्यांना सत्यात उतरवू दयावी पालकांनी अशावेळी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडावी लगेच नको म्हणन्या पेक्षा का नका किंवा कसे योग्य होऊ शकतय त्यावर त्यांना मार्गदर्शन करावे. व त्यांना प्रोत्साहन द्यावे ८)माझ्यावर ओरडून माझ्या मनावर व विचारांवर परिणाम करू नकामूल भावनानाशिल असते त्याला नेहमी प्रेम,माया, ममता व सहानुभूती हवी असते. काही पालकांना आपला राग, थकवा, त्रास हा मुलांवर काढण्याची सवय असते मोठ्याना काही म्हणू शकत नाही म्हणून लहानांवर आरडा- ओरड करून ते आपला राग किंवा त्रागा शमवत अस्तात त्यात मुलांचा काहीच रोल नसतो बऱ्याच वेळा मोठ्याने ओरडणे चारचौघात ओरडणे, सतत रागवण मूलांच्या मनावर परिणाम करतात त्यांच्यात पारतंत्र्याची भावना बळावत जाते त्यामुळे मुल आक्रमक होऊ शकते. न्यूनगंड बाळगू शकतात. प्रसंगी आत्महत्या किंवा घर सोडून जाण्याचा ही प्रयत्न करू शकतात म्हणून पालकांनी मुलांशी बोळतांना प्रेमाने नम्रतेने बोलावे ते पालकाचेच अनुकरण मोठ्या प्रमाणात करत असतात,९)तुमच्या वैयक्तिक समस्या, ज्याचा माझ्याशी काही प्रसंबंध नाहीं त्यात मला ओढू नका-बर्याच वेळा पालक आपल्या कामाच्या ठिकाणी किंवा परिवारात झालेल्या वादाचा किवा त्रासाचा परिणाम घरापर्यंत आनतात व घरातील वातावरण अप्रसन्न होते,त्याचा परिणाम मुलांवर होत असतो मुलांना कौटूबीक वादात साक्षिदार देवून त्यांच्या आड लपण्याची महिलांची सवय असते ज्यात त्यांचा काहीही संबंध नसतो. त्यामुळे परिवाराकडून मुलांवर आरडा-ओरड , मारहाण अश्या क्रिया घडत असतात यामुळे मूल बाई- वडीलां पासून दूर होतात असुरक्षिततेची भावना बळावते म्हणून आपल्या समस्या मध्ये मुलांना ओढू नये बाल मानसशास्त्राचा विचार केला असता मुलांना नैसर्गिक व पोषक वातावर्णात वाढू दिले पाहिजे ज्याचा परिणाम त्याच्या व्यक्तिमत्वार प्रभावी व्हावा १०) मी फक्त हेच च्छीतो / इच्छीते की तुम्ही मला भरमरून प्रेम करा कारण तुम्ही माझे भविष्य आणि आयुष्य आहे-मुल जन्माला आल्यापासुनच पालक मुलांकडून अपेक्षा करतात त्यांचे स्वप्न व ध्येय ठरवतात त्यांच्या गरजा पुर्ण करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करतात मात्र या सर्व खटाटोपीत ते विसरतात की मुल हे एक स्वतः एक व्यक्ती आहे त्याच्याही काही अपेक्षा स्वप्न, ध्येय आहेत ते त्यांना स्वतःपूर्ण करायचे असतात त्यांना स्वतःच्या पद्धतीने आपले आयुष्य जगायचे असते त्यात काही चूकले, अडले तर पालकांनी मार्गदर्शकाची भूमिका पार पाडायची असते स्वतः कोणत्याही गोष्टीचा अनुभव घेतल्या-शिवाय त्याचे महत्व व गांभिर्य मुलांना कळत नसते. म्हणून पालकांनी मुलांवर भरभरून प्रेम करावे मात्र त्या प्रेमामुळे ते गुदमरणार नाही याची काळजी घ्यावी मुलांना घडवताना पालकांनी प्रेम, माया ममता सहानुभूती व मार्गदर्शन या गोष्टी आर्वजून लक्षात ठेवावे मात्र मुले एक स्वतंत्र, व्यक्ती आहे व त्यांचा गरजा त्यांच्या मनाने व आपल्या संस्कारांनी पालकांना पुरवायच्या असतात हे लक्षात घेतले पाहिजे त्याच्या अपेक्षा पूर्ण करीत असतांना त्यांच्या भावनिक, सामाजीक बौद्धिक व आर्थिक गरजा लक्षात घेवून त्यांचे व्यक्तीमत्व व संस्कार घडवले पाहिजे. संस्काराच्या या वरील दशसुत्री प्रमाणे मुलांना घडवले तर नक्कीच आजची पालक व मुल यांच्या विचारात दरी निर्माण होत चालली आहे ती कमी होण्यास मदत होईल.

**श्रीमती सरला शामराव कामे**
**एम.ए, एम.एड**
**kamesala@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002